Estd. 1962
'A++' Accredited by NAAC (2021) With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## प रि प त्र क

५३/२०२५

### विषय - शिवाजी विद्यापीठाचा ६३ वा वर्धापन दिन निमित्त

सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, अधिकारी, व प्रशासकीय सेवक यांना आदेशान्वये कळविण्यात येते की, **शिवाजी विद्यापीठाचा ६३ वा वर्धापन दिन मंगळवार, दि.१८ नोव्हेंबर, २०२५** रोजी साजरा होत आहे. त्या निमित्ताने सदर दिवशी **सकाळी ८.३० वाजता** विद्यापीठाच्या प्रांगणात मा. प्रभारी कुलगुरू प्रा. (डॉ.) सुरेश गोसावी यांचे शुभहस्ते ध्वजारोहण समांरभ संपन्न होणार आहे. तसेच, वर्धापन दिन कार्यक्रम विद्यापीठातील **राजर्षी शाहू सभागृह** मध्ये आयोजित करण्यात आलेला आहे. तरी विद्यापीठातील सर्व शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, सेवक यांनी वर्धापन दिन समारंभास उपस्थित रहावे, ही विनंती.

सदर दिवशी कार्यालयीन व पदव्युत्तर विभागाची कामकाजाची वेळ **सकाळी ८.०० ते ११.३०** अशी राहील, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

(डॉ. व्ही. एन. शिंदे)
**कुलसचिव**

**जा.क्र. आस्थापना/**२१७०
**दि.** 13 NOV 2025
**प्रति,**

१. सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, सर्व उपकुलसचिव, कायदा अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, सहाय्यक कुलसचिव, समकक्ष अधिकारी सर्व प्रशासकीय विभागप्रमुख
२. मा. कुलगुरु, मा. प्र–कुलगुरू मा. कुलसचिव, अधीष्ठाता, मा.संचालक, परीक्षा व मूल्यमापन, व मा. वित्त व लेखा अधिकारी, यांचे कार्यालयास
३. **अभियांत्रिकी विभाग** – अभियांत्रिकी विभागाने वरील दिवशी कार्यक्रमांच्या ठिकाणी स्वच्छता ठेवण्यासंबंधी संबंधिताना सूचना द्यावी. तसेच, ध्वजस्तभांची स्वच्छता व वरील कप्पीची सुस्थिती पहावी. विद्यापीठ परीसरातील सर्व पुतळयांची देखभाल व स्वच्छता पहावी. तसेच पुतळयांना पुष्पहार अर्पण करणेकामी उद्यान विभागास आवश्यक ती सुविधा उपलब्ध करून ध्यावी.
४. **अभियांत्रिकी विद्युत विभाग** – सदर कार्यक्रमांच्या अनुषंगाने आवश्यक तेथे ध्वनीक्षेपकाची, लाईट ची व्यवस्था करावी. तसेच ध्वजारोहण ठिकाणी रांगोली काढणेसाठी लाईटची व्यवस्था करावी.
५. **सुरक्षा विभाग** – प्रमुखांनी ध्वजारोहणप्रसंगी ध्वज हाताळणीसाठी सुरक्षा रक्षकांची नियुक्ती करावी व परेडची व्यवस्था करावी.
६. **विद्यार्थी विकास विभाग**– सदर दिवशी प्रचलित पध्दतीने ध्वजारोहण कार्यक्रमाचे नियोजन करावे.
७. **संगीत अधिविभाग** – विभागप्रमुख, संगीत अधिविभाग यांनी प्रचलीत पध्दतीने सदरच्या कार्यक्रमावेळी स्वागत गीत, विद्यापीठ गीत व पसायदान गायनाची व्यवस्था करावी.
८. **वाहन विभाग** – विभागप्रमुख, संगीत अधिविभाग यांचे सुचनेनुसार त्यांना वाहन उपलब्ध करून द्यावे.
९. **उद्यान विभाग** – सदर दिवशी विद्यापीठ परिसरातील सर्व पुतळयांना पुष्पहार अर्पण करण्याची कार्यवाही करावी. तसेच, कार्यक्रमाच्या ठिकाणी सजावट करावी.
१०. श्री डी. आर. चौगुले, श्री एस. एल. पाथरवट व श्री. बी. पी. वालकोळी, जमादार यांनी समारंभावेळी आवश्यक ती सर्व तयारी करणे (रेड कारपेट, मॅट अंथरणे व काढणे व इतर अनुषांगीक कामकाज)
११. **इंटरनेट विभाग**– सदरचे परिपत्रक संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

**टीप– सदरचे परिपत्रक आपल्या विभागातील सर्व शिक्षक, प्रशासकीय अधिकारी व सेवकांच्या निदर्शनास आणून सदर कार्यक्रमास उपस्थित राहण्याबद्दल सूचना द्यावी.**